Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 5, December 2023; Pages 124 – 130

DOI: 10.5281/zenodo.10072809

**Original Research Article**

# ग्रामविकास व महात्मा गांधी

श्री शरद रमेश सुरळकर

संशोधक विद्यार्थी, सावरगाव जहागीर, ता. मोताळा जि. बुलढाणा ४४३१०२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: sharadsuralkar@gmail.com

Received: 12 October, 2023 | Accepted: 23 October, 2023 | Published: 26 October, 2023

आधुनिक काळात जगाची भारताकडे बघण्याची नजर बदलली असून येणारे शतक हे भारतीय शतक असल्याच्या चर्चा आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर नियमित होत असतात याचे कि कारण एक नवविकसित व सामर्थ्यशाली राष्ट्र म्हणून जगात देशाची ओळख निर्माण होत आहे. आज आपण अंतराळ, माहिती तंत्रज्ञान, औषधी उद्योग, पायाभूत सुविधांची निर्मिती, दळणवळणाची साधने, नवीन उत्पादन उद्योगांची निर्मिती, आधुनिक आरोग्य सुविधा अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून जगाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले आहे. नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या लोकसंख्येच्या आकडेवारी नुसार भारताने चीन ला मागे टाकत लोकसंख्येत पहिला क्रमांक प्राप्त केला असून या प्रचंड लोकसंख्येचा वापर देशाच्या प्रगती साठी करणे अभिप्रेत आहे. २०११ च्या अधिकारीक जनगणनेनुसार व आताच्या लोकसंख्यात्मक आकडेवारी नुसार देशातील सुमारे ६० ते ६५ % लोकसंख्या हि आजही ग्रामीण भागात राहत असल्याचे समजते त्यामुळे खऱ्याअर्थाने देशाचा विकास करायचा असल्यास ग्रामीण भागाचा विकास करणे आवश्यक ठरते. १९९० च्या आर्थिक सुधारणांनी देशात खाजगीकरण, जागतिकीकरण, व उदारीकरणास सुरवात होऊन देशात व विशेतः महाराष्ट्रात औदयोगिक व्यवसायांची निर्मिती झपाट्याने झाली. या काळात रोजगाराच्या नवीन संधी असल्याने लोकांचा अशा ठिकाणी जाण्याचा काल वाढत गेला त्यामुळे अशा क्षेत्रांचा विस्तार होत शहरीकरणास सुरवात झाली आज माहिती तंत्रज्ञान व दळणवणाच्या वेगवान साधनांमुळे शहर व गाव यांच्यातील अंतर कमी झाले आहे याचा परिणाम गावातील सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक घटकांवर होऊन ग्रामस्थांचे विकासविषयक मत बदलत आहे. ग्रामीण भागात नवसुधारणां सोबत नवीन समस्या निर्माण होत आहेत. कमी साक्षरता, महिला पुरुष असमानता, रोजगार नसणे, आरोग्य सुविधांचा अभाव, शाळांचा घसरता दर्जा, व्यसनाधीनता, राहण्याच्या जागेचा अभाव, जल सिंचनाचा अभाव, शेतीचे तुकडी करण, पायाभूत सुविधांचा अभाव, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसणे, अशा अनेक समस्या आज ग्रामीण

भागात दिसून येतात त्यामुळे ग्रामीण भागाचा विकास होणे गरजेचे ठरते. ग्रामीण विकाससंदर्भात बोलायचे झाल्यास आपणास असे म्हणता येईल कि ग्रामविकासाची स्पष्ट अशी व्याख्या नसून ती सतत परिवर्तनीय संकल्पना आहे. आपणास ग्रामविकास म्हणजे काय, ग्रामविकासाचे घटक कोणते हे स्पष्ट करता येत नाही कारण प्रत्येक गाव व त्याचे भौतिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक घटक हे वेगळे असतात. प्रत्येक गावाची गरज व समस्या सुद्धा भिन्न असतात व त्याची सोडवणूक करणारी मानवी व नैसर्गिक संसाधने सुद्धा भिन्न असतात या कारणाने ग्रामविकासाची ठळक अशी व्याख्या करता येत नसली तरी उपलब्ध मानवी व नैसर्गिक संसाधनांच्या उपयोगाने पायाभूत सुविधांची निर्मिती, पिण्यासाठी शुद्ध पाणी, स्वछता, शेती साठी जल सिंचन, गावातच रोजगार निर्मिती, गावातच मिळणारे दर्जेदार शिक्षण, महिलांचे सक्षमीकरण, शेती पूरक लघु उद्योगांची निर्मिती, पशुधन, शेती व्यवसायातील आधुनिकता, मागासवर्गीयांचे कल्याण अशा विषया सोबत व्यक्ती व समाजाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व संस्कृतीक जीवनमानात सुधारणा घडविणे म्हणजे ग्राम विकास होय असे आपणास म्हणता येईल. ग्रामविकास व महात्मा गांधी यांचा जवळचा संबंध असून त्यांनी भारतीय सामाजिक व सांस्कृतिक व्यवस्थेत गावांचे महत्व ओळखले होते. त्यासाठी त्यांनी खेड्याकडे चला असा नारा सुद्धा दिला. महात्मा गांधीजींच्या मते खरा भारत देश हा गावात वसत असून गावाच्या विकासाशिवाय देशाचा विकास होणार नाही. त्यांना स्वावलंबी व स्वयंपूर्ण गावे अभिप्रेत होती व त्या साठी त्यांनी साबरमती आश्रम सोडून वर्ध्या जवळील एका छोट्याशा गावात राहणे पसंत केले. महात्मा गांधी यांचे स्वातंत्र्यातील योगदान तर सर्वांना ज्ञात आहेच तरी स्वतंत्र चळवळी पेक्षा ग्रामविकासातील त्यांचे योगदान मोठे होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. महात्मा गांधींचा गावातील लोकांवर व त्यांच्या क्षमतांवर पूर्ण विश्वास होता त्यांच्या मते गावातील सर्व समस्यांचे उत्तर हे गावातच आहे मात्र हे उत्तर शोधण्यासाढी गावकऱ्यांना प्रशिक्षित करण्याची गरज आहे असे हि ते म्हणत. महात्मा गांधींनी आपले संपूर्ण जीवन देशासाठी व ग्रामीण भागाच्या उन्नती साठी अर्पण केले. महात्मा गांधींना ज्या बाबींच्या आधारे ग्रामविकास साधावयाचा होता त्या आजही तितक्याच महत्वपूर्ण आहेत. महात्मा गांधींचे ग्रामविकास विषयक विचार आपणास पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट येतील.

१. शेती.
२. शिक्षण.
३. पशुधन.
४. स्वावलंबन.
५. खादी व ग्रामोद्योग / स्वदेशी वस्तूंचा वापर.
६. जातीय सलोखा.
७. महिला सक्षमीकरण.
८. सत्तेचे विकेंद्रीकरण व ग्रामपंचायत.
९. वैयक्तिक / सामाजिक स्वच्छता व आरोग्य.

१. **शेती**

भारतीय अर्थव्यवस्थेत आजही शेती व शेती संबंधीत क्षेत्राचा खूप मोठा वाटा असल्याचे दिसून येते. २०२२ च्या आर्थिक सर्वेक्षणा नुसार एकूण अर्थव्यवस्थेच्या सुमारे २० % वाटा हा शेती व शेती संबंधित व्यवसायांचा आहे यावरून आपणास देशाच्या विकासात शेती व्यवसायाचे महत्व कळते. आज वाढत्या लोकसंख्येने शेतीचे तुकडीकरण झाले असून छोट्या छोटया तुकडयांतून मिळणारे उत्पन्न देखील तुटपुंजे स्वरूपाचे आहे. परिणामी शेती व्यवसाय परवड नसल्याची तक्रार शेतकऱ्यांकडून नेहमी होत असते. या वर उपाय म्हणून महात्मा गांधीजी यांनी सामूहिक शेती करण्याचे आवाहन केले. त्यांच्या मते छोट्या तुकड्यावर मेहनत करण्यापेक्षा सामूहिक पणे एकत्रित मोठ्या भागावर मेहनत केल्यास होणारे शेतीचे नुकसान टळेल व सर्वांना सामान मोबदला मिळून प्रत्येकाच्या आर्थिक उन्नतीस हातभार लागेल व ग्रामस्थांमध्ये एकात्मता व सहकार्याची भावना वृद्धिंगत होईल. महात्मा गांधी सामूहिक शेती बरोबरच शेतीत विविध नवीन प्रयोग करण्यावर सुद्धा भर देत असत. ते पीक पद्धतीत काळानुसार बदल करण्याचे सुचवतात तर सोबतच शेतीला सिंचनाची सोय असावी जेणेकरून शेतकऱ्यांना मौसमी पावसावर जास्त अवलंबून न राहावे असे त्यांना वाटते. शेतजमिनीची पोत सुधारून तीची उत्पादन क्षमता वाढावी या साठी महात्मा गांधी हे शेण खताबरोबर कंपोस्ट खताच्या वापरावर भर देत.

२. **शिक्षण :-** शिक्षणात मानवी उत्थानाची शक्ती असून शिक्षणाने व्यक्तीच्या व्यक्तिमत्वात बदल घडून त्याला योग्य आणि अयोग्य यातील फरक कळण्यास मदत मिळते. कोणत्याही राष्ट्राच्या विकासात शिक्षण हे महत्वाची भूमिका निभावत असते. वर्ष २००० नंतर महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात मूलगामी बदल घडून शिक्षणाच्या खाजगीकरणास मोठ्या प्रमाणात सुरवात झाली. सरकारी शाळा व महाविद्यालयांचा घसरता दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने सरकारने खाजगी शाळा व महाविद्यालये सुरु करण्यावर भर दिला मात्र याचे सकारात्मक परिणाम न होता नकारात्मक परिणामच अधिकच झाले. आज खाजगी शाळा, महाविद्यालये आपल्या मनाप्रमाणे शिक्षण शुल्क आकारताना दिसतात ज्याचा परिणाम पालकांच्या आर्थिक स्थितीवर होऊन त्यांच्या आर्थिक उत्पन्नाचा एक मोठा भाग हा शिक्षणावर खर्च होतो. यावर उपाय म्हणून आपणास महात्मा गांधी यांचे शिक्षण विषयक विचार स्वीकारणे गरजेचे ठरते. महात्मा गांधीजींच्या मते वय वर्ष ७ ते १४ या वयोगटातील मुलांसाठी प्राथमिक शिक्षण हे मोफत व सक्तीचे असावे त्याच बरोबर हे शिक्षण मुलांच्या मातृभाषेत देण्यात यावे असेही ते म्हणतात. महात्मा गांधी यांचे शैक्षणिक विचार हे स्वावलंबन, स्वाभिमान, श्रमप्रतिष्ठा या त्रीनीती वर आधारित होते. गांधीजींच्या मते फक्त साक्षर असणे म्हणजे शिक्षित असणे असे नसून ते व्यक्तीने शिक्षण घेऊन स्वावलंबी होण्यावर भर देतात. त्यांच्यामते शाळेतच मुलांना उद्योगाचे, व्यवसायाचे शिक्षण देण्यात यावे जेणे करून मुले हि स्वावलंबी बनतील. महाविद्यालयीन शिक्षण व प्रौढ शिक्षणा संदर्भात सुद्धा त्यांचे असेच विचार होते. ते प्रत्यक्ष शिकण्यावर भर देत त्याच्या मते महाविद्यालये हि ज्ञानाची मंदिर असून अशा ठिकाणाहून सशक्त बुद्धीचा व मेहनती प्रवृत्तीचा व्यक्ती बाहेर पडावा जो देश सेवेस सक्षम असेल. ते मुलांना नवीन व व्यावहारिक शिक्षण देण्यावर भर देतात कारण त्यांच्या मते शाळेत मिळणारे शिक्षण हे व्यक्तीच्या आयुष्यात कुठेच कामाचे पडत

नाही त्यामुळे प्रत्यक्ष व्यावहारिक शिक्षण मुलांना देण्यात यावे. त्यांच्या अठरा कलमी कार्यक्रमात शिक्षणाला विशेष स्थान देण्यात आले होते.

३. **पशुधन :-** ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था हि प्रामुख्याने शेतीवर आधारित असल्याचे महात्मा गांधी जाणून होते सोबतच शेतीचे तुकडीकरण व जमिनीची कमी उत्पादकता यांची करणे सुद्धा जाणून होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेती व्यवसायाबरोबर पशुपालन सुद्धा करावे यासाठी ते आग्रही असत. गायीचे पालन करण्यासंबंधी ते विशेष आग्रही असत. गांधीजी हे गायी ला माता म्हणत कारण गायी पासून पौष्टिक दूध, शेतीसाठी बैल तसेच शेणखत मिळते ज्यांचा वापर आपण शेती मध्ये करत असतो. गायीच्या महत्वा विषयी महात्मा गांधी म्हणतात कि देशातील गायी नष्ट झाल्यात तर आपण हि नष्ट होऊन जाऊ. गायी बरोबरच ते म्हशी व शेळी पालनावर सुद्धा भर देतात. शेती चा हंगाम संपल्या नंतर ग्रामस्थ दूध व दुग्धजन्य पदार्थ विकून आपला उदरनिर्वाह करू शकतात असे महात्मा गांधींना वाटे. ते सामूहिक पशुपालन करण्याचे हि सुचवतात.

४. **स्वावलंबन :-** महात्मा गांधी यांच्या आयुष्यात स्वावलंबनास विशेष महत्व होते ते आपले सर्व कामे स्वतः करत व आपण सर्वांनी आपली कामे स्वतः करावी असे म्हणत. स्वावलंबाचा अर्थ ते व्यक्तिगत सामूहिक पणाने सुद्धा स्पष्ट करतात. त्यांच्या मते गावाच्या गरजेच्या वस्तू ह्या गावातच निर्माण कराव्यात जेणे करून गावातील पैसा हा गावातच राहून ग्रामस्थांची आर्थिक प्रगती होईल.या माध्यमातून गांधीजींना स्वयंपूर्ण व स्वावलंबी गावे अभिप्रेत होती.

५. **खादी व ग्रामोद्योग / स्वदेशी वस्तूंचा वापर :-** गावातील लोकांची अन्न, वस्त्र, निवारा यांची गरज गावातच पूर्ण व्हावी असे महात्मा गांधींचे मत होते. ग्रामीण अर्थ व्यवस्था हि शेतीवर अवलंबून असून ब्रिटिशांनी भारतातील ग्रामीण कुटिरोद्योग नष्ट केल्याने गावाची आर्थिक शक्ती क्षीण झाली असे त्यांचे मत होते. ब्रिटिश हे आपल्याकडील कापूस व इतर शेती पिके कमी भावात विकत घेऊन त्यावर प्रक्रिया करून तो पक्का माल आपणास अधिक किमतीने विकतात हे गांधीजी जाणून होते. त्यामुळे आपल्याकडील शेत मालावर आपणच प्रक्रिया करून तो विकावा व आपण तो विकत घ्यावा असे महात्मा गांधी असे म्हणत. त्यासाठी त्यांनी खादी व चरख्याला ला महत्वाचे स्थान दिले ते स्वतः नेहमी वेळ मिळेल तेव्हा चरखा चालून सूत करण्याचे काम करत असत व इतरांनी सुद्धा रिकाम्या वेळेत सूत करण्याचे कार्य करावे असे सांगत. खादीला इतके महत्व का द्यायचे कारण सांगताना ते म्हणतात कि खादी सहज उपलब्ध होणाऱ्या कच्चा माला पासून तयार करण्यात येते तसेच खादी निर्माणाचे काम कधीही आणि कुठेही करता येते. खादी व्यवसायाला लागणारे भांडवल हि कमी लागत असून त्याच्या बाजार भावात सुद्धा जास्त चढ उतार होत नाही. त्यांच्या मते खादी मध्ये गावची आर्थिक स्थिती सुधारण्याचे क्षमता असून त्याने बेकारी व अर्ध बेकारी नष्ट होते. खादी बरोबरच ते परंपरागत चालणारे व्यवसायावर ही भर देत गावातील मातीच्या वस्तू, झाडू, टोपली, विणकाम दुग्ध व्यवसाय सुरु करण्याचे सुचवतात.

६. **जातीय सलोखा :-** भारत हा जातींमध्ये विभागलेला देश असून देशात ३००० पेक्षा जास्त मुख्य जाती तर जवळ जवळ २०,००० पेक्षा अधिक पोट जाती अस्तित्वात आहेत. या वरून भारतीय समाजाचे स्तरीकरण किती

विस्तीर्ण स्वरूपाचे आहे याची आपल्याला कल्पना येते. देशात जात हा महत्वाचा घटक असून व्यक्तीची व त्याच्या जाती समूहाची प्रगती हि त्याच्या जातीय स्तरीकरणा वरूनच होत आली आहे. अलीकडच्या काळात जातीय विषमतेचे प्रमाण व स्वरूप बदलले असले तरी ते संपूर्णतः नष्ट झाले असे म्हणता येत नाही. जातीय भेदावर महात्मा गांधींचे विचार पुरोगामी असल्याचे समजते ते जाती भेदाला / अस्पृश्यता पालनाला भारतीय समाजावर लागलेला डाग समजत. ते अस्पृश्यता पालन करण्यास पाप मनात व अस्पृश्यता ही हिंदू समाजात शिरलेली घाण असल्याचे हि म्हणत. समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी आयुष्य भर प्रयत्न केले ते म्हणत कि हिंदू धर्मातील लोकांनी अस्पृश्यता पालनाच्या या पापाचे अस्पृश्य मानलेल्या लोकांसोबत प्रेमाने वागून त्यांचा स्पर्श जाणून प्रायश्चित करावे. त्यांनी भारतीय बांधुतेला व एकात्मतेला अस्पृश्यता बाधा असल्याचे म्हटले आहे. ग्रामोध्दार व देशोद्धाराचे कार्य करायचे असल्यास प्रथम आपणास अस्पृश्यता नष्ट करावी लागेल असे त्यांचे मत होते. ते म्हणत कि सर्व मानव हे त्या ईश्वराची लेकरे आहेत आपल्या सर्वांमध्ये हरी आहे आपण सर्व हरी ची लेकरे आहोत म्हणून ते अस्पृशांना हरिजन म्हणजेच हरीची लेकर असे संबोधत. हजारो वर्ष जातीय बंधनात राहिल्याने अस्पृश्य समाजातील लोकांचा आत्मविश्वास नष्ट झाला आहे हे जाणून ते म्हणतात कि सवर्ण लोकांनी अस्पृश्य समाजातील मुलांचा सांभाळ करावा जेणेकरून त्यांच्यात नवीन आत्मविश्वास निर्माण होईल व सवर्णांच्या पुढाकाराने अस्पृश्यता नष्ट होण्यास हातभार लागेल. त्यांनी अस्पृश्य समाजाच्या उन्नती साठी हरिजन सेवक संघाची स्थापना करून त्या माध्यमातून अस्पृश्याना व्यावसायिक शिक्षण देण्याचे कार्य केले. ते म्हणतात कि ज्या दिवशी या देशाचा कारभार हा जातीय व्यवस्थेने कनिष्ठ मानलेल्या भंगी समाजातील व्यक्ती करेल त्या दिवशी मला सर्वात जास्त आनंद होईल. महात्मा गांधी हे आंतरजातीय विवाहाचे पुरस्कर्ते होते आंतरजातीय विवाहांमुळे समाजातील श्रेष्ठ कनिष्ठ भेद नष्ट होऊन जाती निर्मूलन होईल असे त्यांचे मत होते. विवाह कर्त्या वधू वरा पैकी एक जण सवर्ण व एक जण अस्पृश्य असल्यास अशा विवाहांना मी आवर्जून हजार राहील असे म्हणत.

७. **महिला सक्षमीकरण :-** महिला सक्षमीकरण म्हणजे महिलां संबंधित मानव निर्मित सर्व भेद भाव नष्ट करून महिलांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान देणे होय. महात्मा गांधी हे स्त्री पुरुष समानतेचे पुरस्कर्ते होते. महिलांच्या संधर्भात महात्मा गांधीजी म्हणतात कि ज्या समाजात व देशात महिलांचे दुय्यम स्थान आहे त्या समाजाला व त्या देशाला सुसंस्कृत म्हणता येणार नाही. त्यांच्या मते स्त्री व पुरुष दोन्ही सामान असून ते दोघे परस्परांचे पूरक आहेत. किंबहुना महिला ह्या पुरुषांपेक्षा अधिक धैर्यवान व सहनशील असतात. त्यांच्या मते महिलांमध्ये सहनशीलता, प्रेम , ज्ञान, नम्रता अशा गुणांचा समुच्चय असल्याने त्या निस्वार्थ, अहिंसा, व शांतीचे प्रतीक ठरतात. महात्मा गांधींच्या मते प्राचीन काळात महिलांची स्थिती हि चांगली होती मात्र नंतरच्या काळात महिलांवर विविध बंधने लादून त्यांना पुरुषी व्यवस्थेचे गुलाम बनवून टाकले. महात्मा गांधी हे भारतीय स्वतंत्र चळवळीत आल्यानंतर चे एक वैशिष्ठ म्हणजे त्यांच्या राजकीय सक्रियते नंतर भारतीय स्वतंत्र लढ्यात महिलांचा सहभाग वाढलेला दिसून येतो. त्यांच्या येण्याने भारतीय सामाजिक व राजकीय व्यवस्थेत महिलांचा प्रवेश झाला. महात्मा गांधींच्या मते महिलांना सुद्धा शिक्षणाचा अधिकार असून त्यांनी सुद्धा शिकले पाहिजे करून . मात्र हे शिक्षण फक्त अक्षर ओळख म्हणून नव्हे तर त्यांचा वापर सामाजिक व राजकीय व्यवस्थेत बदल करण्यासाठी

करण्यात यावा असे हि ते म्हणतात. ते म्हणतात कि महिला व पुरुषांचा अभ्यासक्रम वेगळा असावा. महिलांच्या अभ्यासक्रमात गरोदरपणातील आरोग्य, गृह व्यवस्था, मुलांचे पालन पोषण आदी विषयांचा समावेश असावा. महिलांना वडिलांच्या मालमतेत अधिकार, कामाचे सामान वेतन मिळावे याचा ते उल्लेख करतात. त्यांच्या मते मुलगा मुलगी सामान असल्याने व दोघे हि सामान काम करत असल्याने त्यांना हे अधिकार देणे आवश्यक आहे. बालविवाह व हुंडा पद्धतीचा त्यांनी विरोध केला. तसेच विधवा पुर्नविवाहास आपला पाठिंबा दिला.

८. **सत्तेचे विकेंद्रीकरण व ग्रामपंचायत :-** सत्तेचे विकेंद्रीकरण म्हणजे सत्ता एका ठिकाणी किंवा फक्त काही लोकांच्या, संस्थांच्या हाती न राहता सत्तेत तळागळा तील शेवटच्या घटकाचा समावेश अभिप्रेत आहे. महात्मा गांधी यांना स्वराज्यात राजकीय व आर्थिक विकेंद्रीकरण असायला हवे असे त्यांचे मत होते. राजकीय सत्ता व आर्थिक शक्ती फक्त काही लोकांच्या हातात असल्यास त्याच्या समाजात सकारात्मक परिणाम होत नाही हे ते जाणून होते. त्यांच्या मते गाव स्वराज्यातील महत्वाचा घटक असून गावाची सत्ता हि गावातील लोकांच्याच हाती असायला हवी या साठी ते आवश्यक तिथे ग्रामपंचायती स्थापन करण्यासंबंधी राज्याने कार्य करावे असे सुचवतात. व या ग्रामपंचायतींच्या माध्यमातून नशा मुक्ती, पशुसंवर्धन, स्वच्छता, आरोग्य या विषयांवर काम करावे असे ते म्हणत. ग्रामपंचायततेतील सदस्यांची निवड हि ग्रामस्थांकडून व्हावी व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी मिळून ग्रामोद्धाराचे कार्य करावे असे ते सांगतात. गावात शाळा, सभागृह, पिण्याचे स्वच्छ पाणी, स्वछता, आरोग्य आदींच्या सोयी असाव्यात. तसेच मोठ्या उद्योगांपेक्षा गावात लहान लहान उद्योग सुरु करण्यावर भर देण्यात यावा कारण मोठे उद्योग कर्त्यांच्या निर्मितीने समाजात भांडवलदारी पद्धत निर्माण होते असे त्यांचे मत होते.

९. **वैयक्तिक / सामाजिक स्वच्छता व आरोग्य** :- महात्मा गांधी हे त्यांच्या जीवनात स्वच्छतेला फार महत्व देत असत स्वछता व आरोग्याचा संबंध त्यांना माहिती होता. गावातील लोक आपले घर स्वच्छ ठेवतात मात्र आपल्या घरातील केर कचरा हा घराजवळच टाकतात. ज्या पिण्याच्या पाण्याचा उपयोग आपण करतो त्याच ठिकाणी कपडे धुणे, गुरे पाजणे, गुरेढोर धुणे, पूजाविधी त्यात टाकणे अशी कामे करून पाणी व परिसर अस्वच्छ करतो व परिणामी अनेक आजारांना बळी पडतो असे महात्मा गांधीजी म्हणत. माणसाने स्वच्छ राहावे आपले घर आपला परिसर स्वच्छ ठेवावा. शौचालय बांधून त्याचा वापर करण्यावरही हे भर देतात. अस्वच्छतेमुळे दुर्गंधी येते व या दुर्गंधीने आजार पसरतात म्हणून ग्रामस्थांनी स्वच्छतेच्या सर्व सवयी आत्मसात करून त्यांचा वापर प्रत्यक्ष जीवनात करायला हवा असे त्यांचे मत होते.

१०. **समारोप :-** आधुनिक काळात गावाचे स्वरूप बदलत चालले असले तरी गावाची मूळ संरचना तीच असल्याचे दिसते. आज जुन्या, नव्या समस्या  जन्माला येत असल्या तरी त्यावर उपाय म्हणून महात्मा गांधी याचे विचार तितकेच प्रभावी असल्याचे समजते. १९९३ नंतर पंचायतराजच्या स्वीकारामुळे ग्रामपंचायतीला जास्तीत जास्त अधिकार मिळून ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ग्रामस्थांची सर्व विकास विषयक कामे पार पाडली जातात. मुळात महात्मा गांधीजींना अभिप्रेत स्वराज्य आणि सत्तेच्या विकेंद्रीकरसाठीच ७३ वि घटना दुरुस्ती केली आहे.

वाढत्या लोकसंख्येने शेतीवर ताण पाडला असून जल सिंचनाचा अभाव, रासायनिक खताचा अतिरिक्त वापर, जमिनीची घसरणारी पोत, वातावरणातील बदलाने शेती व पशुधनावर होणारे परिणाम यामुळे गावात रोजगार उपलब्ध नाही. त्यामळे लोकांचे शहरात जाण्याचे प्रमाण वाढले आहे. गावातील प्राथमिक शिक्षण सुद्धा आता बंद होण्याच्या मार्गावर असून लवकर त्या कडे लक्ष्य दिले नाही तर गावातील शाळा बंद होऊन त्याचा विपरीत परिणाम भावी पिढीवर होणार आहे. ऐषोआरामाच्या अभिलाषेने परिश्रम करणायची प्रवृत्ती कमी होऊन गावात नवीन उद्योग निर्माण करण्यास कमी लोक तयार होतात. त्यामुळे गावात उद्योगांचे प्रमाण नाही च्याच बरोबर आहे. माहिती तंत्रज्ञानाने सकारात्मक परिणाम झाले तरी स्व जात व स्वधर्मा बद्दल चा अतिरिक्त मान तसेच दुसऱ्यांच्या जाती धर्मा बद्दल ची संकुचित नवीन आव्हान गावा समोर निर्माण करत आहे. पंचायतराज च्या व्याप्तीने महिला, अनुसूचित जाती - जमातीचे नवे प्रतिनिधी तयार होत असले तरी निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग चिंतेचा विषय आहे. या मुळे खरच सत्तेचे विकेंद्रीकरण झाले का असा विचार हि मनात येतो. या सर्वांवर उत्तर म्हणून आपणास महात्मा गांधी यांचे ग्रामविकासाचे विचार सांगता येतात. ग्रामसभा आपल्यातील काही व्यक्तींची निवड ग्रामपंचायतीचा कारभार पाहण्यासाठी करत असते. हे ग्रामपंचायत सदस्य आपल्या अधिकारां मार्फत गमविकासाचे कार्य करत असतात ज्यांना महात्मा गांधी यांचे विचार हे नक्कीच प्रेरक आहेत हे सांगता येते.

## संदर्भ सूची

१. ब्रिजमोहन हेडा - महात्मा गांधींचे विचार.

२. डॉ. भारत. एम. राठोड - महात्मा गांधींची ग्रामस्वराजायची संकल्पना - पुणे रिसर्च स्कॉलर्स.

३. आयुषी इंटरनॅशनल इंटरडिसिप्लिनरी रिसर्च जर्नल - २०२०.

४. www.webdunia.com